**वसई-विरार शहर महानगरपालिका**

**निवडणूक विभाग**

**दि.१२/१२/२०२५**

# जाहीर आवाहन

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व मतदार बंधू-भगिनींना आवाहन करण्यात येत आहे कि, ज्या मतदारांची नावे वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या प्रारूप मतदार यादीत दुबार किंवा दोन पेक्षा जास्त वेळा एकाच प्रभागात किंवा विविध प्रभागात आली आहेत, अशा संभाव्य दुबार मतदारांची यादी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या vvcmc.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

अशा दुबार मतदारांनी त्यांना ज्या प्रभागात मतदान करावयाचे आहे, त्याबाबत विहित नमुन्यामध्ये लेखी अर्ज प्रभाग समिती कार्यालये किंवा महानगरपालिका मुख्य कार्यालय येथील निवडणूक विभागात कार्यालयीन वेळेत सादर करावा. सदर विहित अर्जाचा नमुना महानगरपालिकेच्या vvcmc.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.

जे मतदार लेखी अर्ज सादर करतील अशा मतदारांची नोंद अंतिम मतदार यादीमध्ये व मतदान केंद्र निहाय मतदार यादीमध्ये घेण्यात येईल.

मात्र जे मतदार प्रतिसाद देणार नाही, अशा मतदारांना मतदानासाठी मतदान केंद्रावर गेल्यावर मतदान केंद्राध्यक्षाकडे त्यांनी इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान केले नसल्याबाबत किंवा करणार नसल्याचे विहित नमुन्यातील हमीपत्र लिहून द्यावे लागेल तसेच हमीपत्रासोबतच त्यांची काटेकोरपणे ओळख पटल्यानंतरच त्यांना संबंधित मतदान केंद्रावर मतदान करण्याची मुभा देण्यात येईल.

तरी कृपया दुबार नावे आलेल्या मतदारांनी लवकरात लवकर अर्ज सादर करून  महानगरपालिकेला सहकार्य करावे.

निवडणूक विभाग

वसई विरार शहर महानगरपालिका